# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २०६** **दिनांक :- २९/०७/२०२१**

## चोरीची रिक्षा व १७ मोबाईल हॅन्डसेट अशा एकुण २,०६,०००/- रुपयांच्या मुददेमालासह आरोपीतास काशिमीरा पोलीस स्टेशनकडुन अटक.

दिनांक २०/०७/२०२१ रोजी फिर्यादी श्री. किशनकुमार विजय बहादूर यादव रा. रुम नं. १२, बागरी चाळ, पांडुरंग वाडी, काशिमिरा, मिरारोड, पूर्व, ता. जि. ठाणे यांनी त्यांची बजाज ऑटो रिक्षा नं. एम. एच. ४७ सी. २६०२ ही चोरीस गेल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ४९६/२०२१ भादंवि कलम ३७९ प्रमाणे नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास करित असतांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी अल्तमश हनीफ शेख, वय-२३ वर्षे, रा.बी. ३०२, शांतीनगर, मॅकडोनल्डस हॉटेलच्या बाजूला, मिरारोड, पूर्व, ता.जि. ठाणे याचा शोध घेवून त्यास ताब्यात विचारपूस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली देवून त्याचेकडून सदर गुन्हयातील चोरीस गेलेली रिक्षा नं. एमएच-४७ सी २६०२ सह त्याने चोरी केलेले विवो कंपनीचे ०३, सॅमसंग कंपनीचे ०२, रेडमी कंपनीचे ०४, मायक्रोमॅक्स कंपनीचे ०२, आय फोन कंपनीचा ०१, रियल मी कंपनीचा ०१, एमआय कंपनीचा ०१, मोटोरोला कंपनीचा ०१, आय टेल कंपनीचा ०१, इंटेक्स एक्वा पॉवर कंपनीचा ०१ असे १,५६,०००/- रुपये किंमतीचे एकूण १७ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आलेले आहेत. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोउनि. पंकज किलजे करीत आहेत. अटक केलेल्या आरोपीवर यापूर्वी भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर I २६९/२०१४ भादंवि कलम ३८०, ५११, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उपआयुक्त परीमंडळ-१, श्री विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संजय हजारे, पोनि. श्री विजय पवार, पोनि. श्री जितेंद्र पाटील यांचेसह गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/महेंद्र भामरे, सपोनि/प्रशांत गांगुर्डे, पोउनि/जावेद मुल्ला, पोना/१५७४ विश्वनाथ जरग, पोशि/३०७६ जयकुमार राठोड, पोशि/३५२९ अनिल नागरे, पोशि/३४०८ हनुमंत तेरवे, पोशि/२३८२ समीर यादव, पोशि/३५२१ जयदिप बडे, पोशि/४१६० सनी सुर्यवंशी सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केली आहे.

----oooo----